
R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५३ वे, अंक १२वा, मुंबई I फेब्रुवारी २०२३
एकूण पाने २० I प्रती अंक ₹ ५ I वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 53, Issue : 11, Mumbai I January 2023
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50

## संपादकीय

केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी देशाचा २०२३-२४ या वर्षाचा अर्थसंकल्प दिनांक ०१ फेब्रुवारी २०२३ रोजी संसदेत सादर केला. अर्थसंकल्प हा सरकारच्या धोरणाचा आरसा असतो. देशातील नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करणे आणि त्यावेळी आर्थिक दृष्ट्या विवेक पूर्ण राहणे असा समतोल साधण्याचे कसब माननीय अर्थमंत्र्यांनी साधले आहे. अर्थसंकल्पातील एकंदरीत तरतुदी पाहता अमृत काळातील या पहिल्या अर्थसंकल्पाने विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्यासाठी आणि गरीब व मध्यमवर्गासह महत्त्वाकांक्षी समाजाची स्वप्ने साकार करण्यासाठी मजबूत पाया तयार केला आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मध्यमवर्गीयांना सक्षम करण्यासाठी सरकारने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असून यामुळे सर्वसामान्य लोकांचे जीवन अधिक सुलभ व्हावे यासाठी पावले टाकण्याचे ठरवले आहे. मध्यमवर्गांच्या पाठीशी नेहमी उभे राहिलेल्या मोदी सरकारने त्यांना करात मोठी सवलत दिली आहे. वैयक्तिक प्राप्तीकरा मध्ये मोठा बदल करण्यात आला असून त्याचा फायदा मध्यमवर्गीयांना होणार आहे. या केंद्रीय अर्थसंकल्पात सात लाखापर्यंतचे उत्पन्न करमुक्त ठेवून सरकारने मध्यमवर्गीयांना मोठा दिलासा दिल्याचे चित्र निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांसाठी डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर १५७ नर्सिंग कॉलेज स्थापन करून आदिवासींना शिक्षण व नोकऱ्याच्या संधी मिळवून देणे, संशोधनाला चालना देणे, ७४० एकलव्य शाळा स्थापन करून ३८ हजार आठशे शिक्षक तयार होतील व साडेतीन लाख आदिवासी व मागासलेल्याना याचा फायदा मिळेल. पायाभूत सुविधा आणि गुंतवणूक यात दहा लाख कोटींची तरतूद करण्यात आली असून यामुळे आर्थिक प्रगती आणि भरपूर रोजगार उपलब्ध होतील आणि राज्यांना पन्नास वर्षासाठी बिनव्याजी कर्ज देण्यात येणार आहे. पर्यावरण पूरक विकास साधण्यासाठी ग्रीन हाऊस गॅसचे संतुलन राखण्यासाठी १९७०० कोटीची तरतूद करण्यात आली असून यामुळे पेट्रोल, डिझेलचा वापर कमी होईल व एनर्जी ट्राझिशनला मदतच होईल. ज्येष्ठ नागरिक बचत योजनेच्या माध्यमातून गुंतवणूक करण्यात येणाऱ्या रकमेची मर्यादा वाढवून ३० लाख रुपये करण्यात आली आहे. यापूर्वी ही मर्यादा पंधरा लाख रुपये होती. या योजनेमुळे ज्येष्ठांना नियमित आर्थिक मदत मिळेल असा उद्देश त्या पाठीमागे आहे. केंद्र सरकारने ३१ मार्च २०२३ रोजी संपणाऱ्या तिमाहीसाठी ज्येष्ठ नागरिक बचत योजनेवरील व्याजदर वाढवून आठ टक्के केले आहे. याशिवाय टपाल मासिक उत्पन्न योजनेच्या मर्यादेची वाढ करण्यात आली आहे.



देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

# समाचार

वर्ष ५३वे, अंक १२वा,
फेब्रुवारी २०२३
(फक्त सभासदांसाठी)


**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९


**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**


दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in













HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving
75+ Countries Worldwide
30+
YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire

*With*
*Best*
*Compliments*
*From*



S E

# SANGRAM ENTERPRISES

**PHARMACEUTICAL DISTRIBUTORS**

**VILAS JOSHI I SANGRAM JOSHI I SOUMITRA JOSHI**

**: Office :**

Apollo, A-3, Basement,
Bajiprabhu Deshpande Marg,
Vishnu Nagar, Naupada,
Thane (West) 400602
Tel. : 25408561 / 25408565

महामार्ग उभारणी बंदरे, कोळसा, पोलाद, खते, धान्य क्षेत्रासाठी आवश्यक प्रकल्पासाठी दहा लाख रुपये कोटी खर्च करणार असल्याची घोषणा माननीय अर्थमंत्र्यांनी केली आहे.

केंद्र सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांपैकी राष्ट्रीय आरोग्य मिशनसाठी असलेली तरतूद २८ हजार ९७४ कोटी वरुन २९ हजार ८५ कोटी रुपये करण्यात येणार आहे. या अर्थसंकल्पात क्रीडा क्षेत्रासाठी आत्तापर्यंतची सर्वाधिक म्हणजे ३३९७.३२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आगामी आशियाई क्रीडा स्पर्धा आणि २०२४ चे पॅरिस ऑलिंपिक डोळ्यासमोर ठेवून केंद्रीय अर्थसंकल्पात क्रीडा क्षेत्रासाठी मोठी तरतूद करण्यात आली आहे. जागतिक मंदीच्या वातावरणात सादर झालेला हा अर्थसंकल्प काही प्रमाणात विकासाभिमुख आहे असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही. मध्यमवर्गीयांच्या पाठीशी नेहमी उभे राहिलेल्या मोदी सरकारने त्यांना करात मोठी सवलत दिली आहे. एकूणच अर्थसंकल्पातील सर्व तरतूदी पाहता हा अर्थसंकल्प सर्व भारतीयांना लाभदायक होवो याच अपेक्षा.

**– मिलिंद सरदेशमुख**
(संपादक)

## समर्थ स्थापित अकरा मारुतींच्या मागची समर्थांची संकल्पना

**स. भ. मोहनबुवा रामदासी (मो. : ९१४६८५५६९१)**

समर्थांनी संपूर्ण भारतभर अनेक मारुती मंदिरे स्थापन केले आहेत. त्यातील अकरा मारुती विशेष आहेत. त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. इ.स. १६४५ ते १६५५ अशा दहा वर्षांच्या काळात समर्थानी या ११ मारुतींची स्थापना केली होती. तत्कालीन परिस्थितीचे निरीक्षण करून समर्थांनी धर्माला व समाजाला उपयुक्त असे शक्तीचे, तेजाचे प्रतीक असलेले हे मारुतीराय उभे केले. त्यांच्यायोगे बलोपासना आणि कोणत्याही संकटापुढे धीटपणे उभे राहण्याची प्रेरणा समर्थांनी लोकांना दिली. दळणवळणाची साधने नसताना त्या काळात कदाचित संपर्ककेंद्रे म्हणूनही या समर्थ स्थापित मारुती मंदिरांचा उपयोग होत असावा. संपर्काचे एक जाळे निर्माण करण्याचा हा प्रयत्न असावा असे वाटते.

हे अकरा मारुती कोणते आहेत? तर ते म्हणजे समर्थांच्या शिष्या वेणास्वामी ह्यांच्या पुढील अंभगात ह्या अकरा मारुतींबद्दल उल्लेख आहे :

चाफळामाजीं दोन, उंब्रजेसी येक । पारगांवीं देख चौथा तो हा।। पांचवा मसूरी, शहापुरीं सहावा। जाण तो सातवा शिराळ्यांत।। सिंगणवाडीं आठवा, मनपाडळें नववा। दहावा जाणावा माजगांवीं।। बह्यांत अकरावा, येणें रीतीं गांवा। सर्व मनोरथा पुरवील।। वेणी म्हणे स्वामी समर्थ रामदास। कीर्ती गगनांत न समावे।।

श्री समर्थ स्वतः या बाबत म्हणतात :

अक्रा अक्रा बहू अक्रा । काय अक्रा कळेचिना ।
गुप्त ते गुप्त जाणावे । आनंदवनभूवनी ।।

यातील गुप्त म्हणजे काय असावे? याबाबत थोडेसे चिंतन, मनन केले तर ते आपल्या लक्षात येऊ शकेल श्री समर्थ रामदास स्वामी यांनी संपूर्ण भारतभ्रमण केले. अनेक प्रांत, तीर्थे, वने, विविध क्षेत्र ते फिरले परंतु त्यांना महाराष्ट्रातील सातारा, सांगली व कोल्हापूर या तीन जिल्ह्यातच अकरा मारुतींची स्थापना का करावी वाटली असेल? या तीन जिल्ह्याची निवड करण्यामागे काहीतरी गुप्त प्रयोजन असावे किंवा काहीतरी कारण

असावे. आपण पाहिलं तर लक्षात येईल की त्या भागावर, त्यावेळी शहाजी महाराजांची जहागिरी होती. त्याच कालखंडामध्ये त्या भागात हिंदूंवर अनेक अन्योन प्रकारचे अत्याचार होत होते. अनेक महिलांवर अत्याचार होत होते. त्यांची विक्री होत होती. तेथील जनतेला या दुष्ट प्रवृत्तींचा कितीतरी त्रास होत होता. अनेक ठिकाणचे उत्सव, समारंभ यात अडथळे आणले जात होते. यापैकी एक उदाहरण म्हणजे – बत्तीस शिराळ्याचा समर्थ स्थापित अकरा मारुतींपैकी एक मारुती आहे. नागपंचमीचा सण अनेकानेक वर्षांपासून त्या ठिकाणी सुरू होता. त्या उत्सवामधे अनेक प्रकारची विघ्न आणली जायची. अशा प्रकारे धार्मिक कार्यामधे व्यत्यय आणणे चालूच होते व आपल्या जनतेला अशा ठिकाणी राहाणे, उत्सव साजरे करणे जिकिरीचं होऊन बसले होते.

समर्थ भारतभर भ्रमंतीवर होते अनेक ठिकाणी ते फिरले परंतु त्यांनी त्यांच्या आद्यमठासाठी चाफळच्या खोऱ्याचीच निवड का केली असावी? यामागे असणारी संकल्पना लक्षात येते ती म्हणजे ही की, चाफळ असे क्षेत्र आहे जेथे समर्थ रामरायांची स्थापना करतात. अंगापूरच्या डोहात सापडलेले रामराय हे समर्थांनी चाफळला स्थापित केले, अंगापूरच्या डोहात सापडलेल्या देवीची स्थापना सज्जनगडावर केली.

त्यानंतर अशाच प्रकारे जनतेवर छळ सुरू असणाऱ्या मसूर या ठिकाणी समर्थांनी पहिला मारुती स्थापन केला. याच मसूरच्या मारुतीसमोर समर्थांनी रामनवमी उत्सव सुरू केल्याची नोंद आहे किंवा तसा इतिहास सांगतो. अशाप्रकारे अकरा मारुती आहेत त्यांचे वेगवेगळ्या प्रकारे महत्त्व वर्णन केले आहे. हे मारुती स्थापन करताना भूमिका एकच होती की शहाजी महाराजांना त्याचा चांगल्या प्रकारे उपयोग व्हावा. स्वराज्य संस्थापनेचं स्वप्न घेऊन येणारे छत्रपती शिवाजी महाराज हे स्वराज्य संस्थापनेचं स्वप्न साकार करण्यासाठी प्रभूरामचंद्रांनी केलेली योजना असावी आणि छत्रपती शिवाजी महाराजांना होणारं समर्थांचं मार्गदर्शन महत्त्वाचं होतंच म्हणून समर्थांनी या तीन जिल्ह्यांमध्ये अकरा मारुतींची स्थापना केली. प्रत्येक मारुतीचं वेगळं वैशिष्ट्य आहे.

माझ्या समर्थ स्थापित अकरा मारुतींवर एक पुस्तक लिहिलं आहे. त्यावेळी माझ्या मनात विचार आला की समर्थांनी अकरा मारुतींची स्थापना केली व अकरा वेगवेगळी स्तोत्रे लिहिली पण कुठेही असा उल्लेख नाही की हे हे स्तोत्र या या मारुतीचं आहे पण समर्थांच्या कृपेनं, श्रीमारुतीरायांच्या कृपाशीर्वादाने मी अकरा मारुतींची यात्रा केली, प्रत्येक ठिकाणी जाऊन मुक्काम केला, सकाळी अभिषेक, पूजा केली आणि त्यावेळी माझ्या असं लक्षात आलं हे स्तोत्र या मारुतीचं आहे कारण समर्थांनी स्तोत्रामध्ये त्या त्या मारुतीचं वर्णन केलं आहे. उदाहरणार्थ पहिलं स्तोत्र चाफळच्या वीर मारुतीचं आहे. दुसरं स्तोत्र शिंगणवाडीच्या म्हणजे खडीच्या मारुतीचं आहे. पाचवं स्तोत्र चाफळच्या रामासमोर असलेल्या दास मारुतीचं आहे. सहावं स्तोत्र हे शहापूरच्या सतीबाईंसाठी केलेलं आहे. अकराव्या स्तोत्राचं एक विशेष महत्त्व बाहेबोरगावचा (बाह्याचा) जो मारुती आहे. प्रभू श्रीरामचंद्र जेव्हा या परिसरातून जात होते आणि रामरायांची संध्येची वेळ झाली तेव्हा हनुमंतरायांना रामरायांनी सांगितलं की आता आपण इथे संध्यावंदनासाठी थांबलं पाहिजे आणि हनुमंतरायांनी त्या ठिकाणी थांबले. त्या वेळी कृष्णा नदीचा प्रवाह इतका जोरात वाहत होता की तो थांबवणं आवश्यक होतं. त्याशिवाय संध्यावंदनासाठी बसणं शक्य नव्हतं. त्यामुळे हनुमंतरायांनी कृष्णा नदीचा प्रवाह थांबवला. तिथेच सिरटा नावाचं गाव आहे तिथे सीतामाईंना ठेवल्याची नोंद आणि उल्लेख त्या स्तोत्रात आहे.

थोडक्यात अकरा मारुतींचं वर्णन करणारी ही अकरा स्तोत्रं प्रसिद्ध आहेत. यातील सहावं स्तोत्र हे समर्थांनी स्वतःच्या कफाच्या व्यथेचं निरसन होण्यासाठी केलेलं स्तोत्र आहे. अशी खूप प्रभावी स्तोत्र पाहायला मिळतात. बलोपासना, सूर्यनमस्कार हे तर आहेच, समर्थ स्वतः हे मारुतीरायांचे अवतार म्हणूनच प्रसिद्ध आहेत. तुकाराम महाराजांनी त्यांचे वर्णनही तसेच केले आहे. अशा अकरा मारुतींच्या स्थापनेमागे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य संस्थापनेचं स्वप्न साकार करणं, हा अत्यंत महत्त्वाचा व गुप्त संदेश त्याच्यामध्ये

पाहायला मिळतो. अकरा मारुतींचा इतिहास पाहायला गेलं तर आपल्याला त्यांच्याविषयी जास्त वाचायला मिळत नाही पण हे लक्षात येतं की या अकरा मारुती स्थापनेमागे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य संस्थापनेचा मुख्य उद्देश होता आणि तो यशस्वी होण्यासाठी समर्थांनी संघटन बांधलं. मारुतीरायांच्या स्थापनेमागे त्यावेळची तरुणपिढी, हा शक्तीसंपन्न व्हावी, सामर्थ्य संपन्न व्हावी आणि हिंदूंची संघटन शक्ती वाढवावी. याच्यासाठी समर्थांनी ही अकरा मारुतींची स्थापना केलेली आहे. स्तोत्र रचली आणि याचं पठण करून अनेकांना अनेक प्रकारचे आध्यात्मिक लाभ झालेले आहेत.

आजच्या संगणकीय युगात शारिरीक परिश्रमापेक्षा बौद्धिक कौशल्यास जास्त महत्त्व आहे. यामुळे कष्ट कमी झाले आहेत व बौद्धिक कष्ट वाढले आहेत. युवापिढीच्या डोक्यावर सतत ताण आहे, ते अतिविचार करीत आहेत. त्यामुळेच मानसिक ताणतणावाचे आजार व व्यसनांची बेडी आजच्या तरुणाईला पडली आहे. परंतु शारिरीक सुदृढता आली तरच मानसिक कणखरता येऊ शकते हे आजच्या पिढीच्या लक्षात येताना दिसत नाही. समर्थ रामदास स्वामींनी शरीर सौष्ठवासाठी व बलवान शरीरासाठी सूर्यनमस्कार व बलोपासनेचा मार्ग युवा पिढीला दाखवून दिला आहे. कुठलेही विज्ञान सूर्यनमस्कार व त्याचे फायदे नाकारत नाही. त्यामुळे आजच्या पिढीने हा मार्ग निर्धोकपणे अवलंबिला तरी त्यांचे नुकसान होणार नाही.

दुसरी महत्त्वाची गोष्ट समर्थांनी साडेतीनशे वर्षांपूर्वीच सांगितली ती म्हणजे संघटनाची शक्ती. आजकालच्या कार्पोरेट ऑफिसेसमधून जे टीमवर्कचे धडे दिले जातात. तेच समर्थांनी त्यावेळी खेडोपाडी जाऊन तरुणांना दिले. कुठलेही मोठे काम संघटनाशिवाय होऊ शकत नाही, संघटनात काम केल्याने मैत्री होते, संवादाची क्षमता विकसित होते हे आज आपण अनेक पुस्तकातून वाचतो पण हे समर्थांनी आधीच पटवून दिलेलं आहे.

सूर्यनमस्कार व संघटनाची शक्ती तसेच मनाच्या नियंत्रणासाठी मनाच्या श्लोकांची गुरुकिल्ली समर्थांनी आपल्या हाती ठेवली आहे.

समर्थांचे कार्य व त्यामागील संकल्पना समजून घेण्यास भरपूर वाव आहे. त्याच प्रमाणे अकरा मारुतींवर जेवढं बोलावं, जेवढं लिहावं, तेवढं ते कमी पडेल. असे अनेक मारुती आहेत जे समर्थांनी स्थापन केलेले आहेत. गावोगावी आपल्याला असे अनेक मारुती लोक दाखवतात की हा समर्थ रामदासांनी स्थापित मारुती आहे. पण या अकरा मारुतींचं महत्त्व मात्र निश्चितपणे आपल्याला वेगळेपणाने मांडता येतं, पाहता येतं, आणि त्याचा अभ्यास करता येतो.

## संलग्न संस्था वृत

**भुसावळ** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघातर्फे शनिवार दि. २८ जानेवारी २०२३ रोजी रथसप्तमीच्या शुभमुहूर्तावर उत्तर महाराष्ट्र देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाचे अधिवेशन व श्री गणेश यागाचे आयोजन करण्यात आले होते. सदर धार्मिक व सामाजिक कार्यास असंख्य समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे मुंबई येथील श्री. विलासराव जोशी अध्यक्ष, श्री. प्रभाकरराव कुलकर्णी-कार्याध्यक्ष, श्री. प्रसाद ठकार-कार्यवाह, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचारचे संपादक श्री. मिलिंद सरदेशमुख, तसेच बडोदा येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाचे अध्यक्ष श्री. नितिन शहापूरकर व महिला शाखाप्रमुख सौ. माधवीताई मोगरकर हे उपस्थित होते. अधिवेशनास जळगांवचे श्री. विश्वास कुलकर्णी, ॲड. श्री. सुहास जोशी, श्री. विलास देशमुख व श्री. उदय खेडेकर हे प्रतिनिधी उपस्थित होते. सदर कार्यक्रम भुसावळ येथील स्वा. सावरकर संस्थेच्या सेवा प्रकल्पस्थळी संपन्न झाला. यावेळी भारतीय

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून समाजातील ७५ वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठांचा सत्कार करण्यात आला.

भुसावळ शाखेच्या अध्यक्षा सौ. प्रियदर्शनी पेटारे यांनी संस्थेने हाती घेतलेल्या लघुउद्योग व वधू-वर सूचिच्या प्रकल्पांना समाजबांधवांकडून यथायोग्य सहकार्य व सहभागाचे विनम्र आवाहन केले. तर सचिव सौ. लक्ष्मी वढवेकर यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमास सुरुवातीला कु. धनश्री जोशी व सहकाऱ्यांनी समाजप्रबोधनपर भारुड सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. प्रकाश पेटारे यांनी तर आभार श्री. गणेश वढवेकर यांनी मानले. संजय बोचरे, सुधीर देशपांडे, रमाकांत केऱ्हाळकर, प्रतीक बोचरे, प्रणव वढवेकर, सौ. अंजली कवठाळकर, सौ. अनिता वाघमारे, सौ. मंगला केऱ्हाळकर आणि सौ. प्रतिभा बोचरे यांनी परिश्रम घेतले. श्री गणेश यागाचे आचार्यप्रद श्री. शाम कुलकर्णी, श्री. जितेंद्र आठवले, श्री. दीपक पाथरकर व श्री. रमाकांत केऱ्हाळकर यांनी भूषविले. कार्यक्रमानंतरच्या प्रसाद भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**डोंबिवली-स्नेहसंमेलन २०२३- एक चैतन्य सोहळा!**

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ डोंबिवली यांचे ५३ वे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक २९ जानेवारी २०२३ रोजी हेरिटेज या विशाल सभागृहात अत्यंत दिमाखात संपन्न झाले. सुमारे ३५० ते ४०० सभासद बंधू भगिनी या सोहळ्यास उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन होऊन प्रथम स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले आणि नंतर श्री. तुकाराम कटेकर (माजी संमेलनाध्यक्ष) यांच्या कुंचल्यातून उतरलेल्या मोहक अर्क-चित्रांच्या प्रदर्शनाचे, संमेलनाध्यक्ष श्री. शरदचंद्र झरेगावकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्राची सुरुवात सुप्रसिद्ध गायक कलाकार नीलेश निरगुडकर आणि केतकी निरगुडकर सावंत यांच्या सुमधुर प्रसिद्ध मराठी व हिंदी गीतांनी झाली.

संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात संमेलनाध्यक्ष श्री. झरेगावकर, प्रमुख अतिथी डॉक्टर मंजुषा कुलकर्णी ,विशेष अतिथी सौ. माधवीताई मोगरकर, मध्यवर्ती मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी, विश्वस्त अध्यक्ष श्री. अविनाश कुलकर्णी, संस्थेचे अध्यक्ष श्री. जगन्नाथ जोशी, उपाध्यक्ष श्री. महाशब्दे आणि कार्यवाह श्री. नरेश कुलकर्णी यांच्या व्यासपीठावरील आगमनाने! संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व शाल श्रीफळ चांदीचे स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला.

विश्वस्त अध्यक्ष श्री. अविनाश कुलकर्णी यांनी त्यांच्या भाषणात संस्थेची आतापर्यंत झालेली वाटचाल, त्यासाठी आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी केलेले प्रयत्न याचे विश्लेषण केले तर अध्यक्ष श्री. जगन्नाथ जोशी यांनी, कोरोना काळात सर्व व्यवहार बंद असतानाही,संस्थेने कार्यालयासाठी नवीन जागा घेतली व प्रगतीचे चक्र कार्यकारिणी व विश्वस्तांनी गतिमान केल्याची माहिती दिली तसेच या कामाला मदत केल्याबद्दल सर्व बांधवांबद्दल तसेच वेळोवेळी मोलाचे अर्थसाह्य केल्याबद्दल मध्यवर्ती मंडळाविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

महिला समिती, युवा समिती आणि बाकी सर्व समित्यांनी वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ डोंबिवली संस्थेने ५३ व्या स्नेहसंमेलनानिमित्त काढलेली ऋग्वेद स्मरणिकेचे संमेलनाध्यक्ष श्री. झरेगावकर यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले . समाजात विविध क्षेत्रात काम करणाऱ्या १) सौ. अलकाताई मुतालिक, अध्यक्ष, गणपती संस्थान (आध्यात्मिक क्षेत्र), २) मेजर विनय देगावकर (देशसेवा), ३) श्री. सुरेशराव पिंगळे (सहकार क्षेत्र, समाजसेवा), ४) सौ. नंदिनी कुलकर्णी (बँकिंग), ५) श्री. अजय कुलकर्णी (उद्योजक), ६) श्री. संजीव कटेकर (करोना काळातील लोकसेवा)

या मान्यवर सभासदांचा संमेलनाध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते शाल श्रीफळ पुष्पगुच्छ चांदीचे नाणे देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच या स्नेहसंमेलनासाठी मुंबई विलेपार्ले मुलुंड कल्याण येथून आलेल्या संलग्न संस्थांतील प्रतिनिधींचा, ब्राह्मण महासंघ डोंबिवलीच्या पदाधिकाऱ्यांचा व बीबीएनजीचे प्रमुख अरविंद कोंहाळकर यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

संमेलनाच्या प्रमुख अतिथी, संस्कृतच्या पंडिता, डॉक्टर मंजुषा कुलकर्णी यांनी अस्खलीतपणे, संस्कृतमधून आपल्या भाषणाला सुरुवात केली. संस्कृत भाषेतच भारतीय संस्कृतीची पाळेमुळे रुजलेली आहेत, हा त्यांच्या भाषणाचा विषय होता. यानंतर मुलुंड शाखेच्या कार्यकारिणी सभासद आणि उत्कृष्ट वक्त्या सौ. अरुणा अग्निहोत्री यांनी 'मी देशस्थ' या विषयावर मौलिक विचार मांडले. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ मध्यवर्ती मंडळ समाचार या मासिकाचे संपादक असलेल्या श्री. मिलिंद सरदेशमुख व श्री. आनंद कुलकर्णी विलेपार्ले यांच्या बडोदा संमेलनातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल संस्थेने शाल, श्रीफळ, भेटवस्तू, पुष्पगुच्छ देऊन त्यांचे कौतुक केले.

विशेष अतिथी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ बडोदाच्या महिला शाखेच्या अध्यक्ष सौ. माधवीताई मोगरकर यांनी समर्थ रामदासांच्या तेजस्वी, प्रेरणादायक जीवन प्रवासाचे रसाळ वर्णन करून श्रोत्यांचे प्रबोधन केले. संमेलनाध्यक्ष बँकिंग, वित्त क्षेत्रात मोठ्या पदावर काम केलेल्या, श्री. शरच्चंन्द्र झरेगावकर यांनी निवृत्तीनंतरच्या जीवनात अर्थ येण्यासाठी भगवद्गीतारूपी अमृत ग्रंथाचे महत्त्व सांगून जीवन कृतार्थ होण्यासाठी भगवद्गीता शिका आणि आचरणात आणा असे बहुमोल मार्गदर्शन केले.

संस्थेच्या परंपरेप्रमाणे दरवर्षी संलग्न संस्थामधील कार्यकर्त्यांमधून उत्तम कार्य करणाऱ्या कार्यकर्त्याची उत्कृष्ट कार्यकर्ता म्हणून निवड करण्यात येते. यावर्षी ऋग्वेदी ब्राह्मण संघ बडोद्याचे अध्यक्ष श्री. नितीन दिगंबर शहापूरकर यांचा उत्कृष्ट कार्यकर्ता म्हणून संस्थेतर्फे पुष्पगुच्छ शाल श्रीफळ चांदीची भेट वस्तू आणि मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावर्षीचा जीवन गौरव पुरस्कार संस्थेचे माजी अध्यक्ष आणि विद्यमान विश्वस्त श्री. अरविंद त्रिंबकराव हस्तेकर यांना पुष्पगुच्छ शाल श्रीफळ भेटवस्तू आणि मानपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या मानपत्रांचे लेखन सौ. शुभदा कुलकर्णी यांनी केले होते.

या संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन सौ. शुभदा कुलकर्णी आणि सौ. अनुराधा मोहिदेकर यांनी केले. आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. हे संमेलन अत्यंत आगळे वेगळे अविस्मरणीय झाले ते केवळ संस्थेच्या उत्तम नियोजन आयोजनामुळे!

**दिन विशेष** : डोंबिवली येथे नागरिकांनी साजरा केलेल्या लष्कर दिनानिमित्त (आर्मी डे) दि. १५ जानेवारी २०२३ या दिवशी मा. लेफ्टनंट कर्नल श्री. संजय कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून भव्य कार्यक्रमास उपस्थित होते. भारत सरकारने त्यांना PVSM, AVSM, SC,SM, VSM, या सन्मानाने गौरविले आहे. वडोदरा येथे झालेल्या अखिल देशस्थ ऋग्वेद ब्राह्मण रौप्य महोत्सवी परिषदेत 'ऋग्वेद भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. ज्ञातीतील श्री. संजय कुलकर्णी यांचा आम्हाला अभिमान वाटतो.

**डोंबिवली महिला समितीचा वृत्तांत** : जानेवारी महिन्यात महिलांच्या दोन पाक्षिक सभा घेण्यात आल्या तीन जानेवारी २०२३ रोजी झालेल्या सभेत आगामी एकदिवसीय सहली बद्दल माहिती दिली आणि शाकंभरी देवीचे नवरात्र चालू असल्यामुळे महिलांनी शाकंभरी देवी त्यांच्या प्रचलित कथा सांगून देवीची गाणी म्हटली.

दिनांक ६ जानेवारी २०२३ ला महिला समितीची सहल नाशिक येथील फ्लोरल गार्डन, प्रतिकेदारनाथ

मंदिर, गजानन महाराज मठ व कपिल तीर्थ या ठिकाणी जाऊन आली. सहलीत ३० सभासद भगिनी सहभागी झाल्या होत्या.

१७ जानेवारीला संस्थेच्या महिला सभासदांसाठी संक्रांत हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सुमारे ६० महिला उपस्थित होत्या.

अतिशय उत्साही वातावरणात, सर्वजणींना हळदीकुंकू, अत्तर लावून तिळगूळ, वाण देण्यात आले.

**मुलुंड** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था, मुलुंड संस्थेच्या वतीने मंगळवार दि. २०.१२.२०२२ रोजी सायंकाळी ०६.१५ वाजता संस्थेच्या दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात व्याख्याते श्री. रविंद्र भिडे (निवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त) यांचे यसायबर क्राईमल या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी वरील विषय सोपा करून सांगण्यासाठी त्याची विभागवार मांडणी केली.

पहिल्या विभागामध्ये २६/११ च्या पाकिस्तान पुरस्कृत मुंबईवरील हल्ल्यासंबंधी त्यांनी सविस्तरपणे माहिती सांगितली. या हल्ल्याच्या पूर्ण चौकशीमध्ये त्यांचा वैयक्तिक सहभाग असल्याने लोकांना संपूर्ण खरी हकिगत/वस्तुस्थिती समजली. त्यांच्या टीमच्या कुशल तपासामुळे हा हल्ला पूर्व नियोजित व पाकिस्तान पुरस्कृत होता हे आंतरराष्ट्रीय न्याय व्यवस्थेला पटवून देण्यात ते यशस्वी झाले. दुसऱ्या विभागामध्ये त्यांनी वरील घटनेमूळे यसायबर पोलिस स्टेशनल स्थापन करणेची आवश्यकता भासल्याचे सांगितले व त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी करण्याचे प्रयत्न करून, त्यांत ते यशस्वी झाले. यसायबर पोलिस स्टेशनल ही संकल्पना प्रत्यक्षात येण्यासाठीची सर्व कार्यपद्धती, ट्रेनिंग, नियम व मनुष्यबळ वगैरे सर्व गोष्टींची पूर्तता करण्यांत ते यशस्वी झाले. या कामी त्यांना पोलिस खात्यातील अनुभवाची शिदोरी कामी आली.

तिसऱ्या विभागामध्ये त्यांनी सर्वसामान्यामध्ये या गुन्ह्यासंबंधी जागरुकता आणणे, या विषयीची माहिती सांगितली. त्याचप्रमाणे गुन्हा घडूच नये यासाठी प्रतिबंधनात्मक कोणते उपाय योजता येतील या संबंधीच्या सूचना केल्या. उदा. सोशल मिडीयावर आपली वैयक्तिक माहिती कमीत कमी द्यावी किंवा जर आपल्या बँक खात्यात अनामिक रक्कम जमा झाली व कोणी व्यक्ती ती रक्कम परत करण्याची विनंती करीत असेल, तर सदरची रक्कम त्या व्यक्तीस पोलिस स्टेशनमध्ये येऊन घेण्यास सांगणे वगैरे. त्यांच्या भाषणाची ओघवती शैली, माहितीची अचुकता व सहज सोपी भाषा यामुळे श्रोतवृंद २-२.३० तास भारावून व्याख्यानांमध्ये दंग होता. पोलिस खात्याच्या एका वेगळ्याच 'जनहितैषी' पैलूचे सर्वांना दर्शन घडले.

कार्यक्रमास विश्वस्त श्री. राम दिगवडेकर, सौ. उज्वला जोशी, महिला शाखा अध्यक्ष सौ. प्रेरणा क्षीरसागर, श्री. प्रकाश लोणकर, सौ. अरुणा आग्नहोत्री व कल्याण संघाचे श्री. विजय चाव्हरे उपस्थित होते.

कार्यवाह व या कार्यक्रमाची प्रेरणा असणारे श्री. नितीन देशपांडे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्याध्यक्ष श्री. आडगांवकर यांनी पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचे स्वागत केले. सौ. प्रतिभा जोशी व सौ. आरती कुलकर्णी यांनी कुशलतेने सुत्र संचालन केले व श्री. प्रफुल्ल निमदेव यांनी आभार प्रदर्शन केले. कॉफी पानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था (मुलुंड ) – महिला शाखा : रौप्यमहोत्सवी स्नेहसंमेलन व तिळगुळ समारंभ**

शनिवार दि. २१-१-२०२३ रोजी संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाला येणाऱ्या प्रत्येकाचे स्वागत हळदी कुंकू, अत्तर लावून,चाफ्याचे फूल व तिळगुळ देऊन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. आरती कुलकर्णी यांनी अतिशय सुंदर प्रकारे केले. महिला शाखा अध्यक्ष डॉ. सौ. प्रेरणा क्षीरसागर, उपाध्यक्ष सौ. उज्वला जोशी व प्रमुख पाहुण्या श्रीमती अंजली वळसंगकर यांनी

दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. डॉ. सौ. प्रेरणा क्षीरसागर यांनी आपल्या प्रास्ताविकात कै. सौ. घोटीकर यांच्या अध्यक्षतेखाली ऑक्टोबर १९९६ रोजी महिला शाखा कशी स्थापन केली हे सांगितले. महिला शाखा स्थापन झाली आणि आज तागायत सतत २५ वर्षे संस्थेचे अनेक कार्यक्रम महिला शाखेतर्फे अत्यंत जोमाने, एकजुटीने आणि शिस्तबद्ध नियोजनाने होत असतात. त्याबद्दल संस्थेकडून त्याची वेगळी नोंदही घेतली जाते असेही सांगितले. श्रीमती वैशाली सांगलीकर, माजी महिला शाखा अध्यक्ष व माजी विश्वस्त, त्यांच्या सत्कार डॉ. सौ. प्रेरणा क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला.

बालकलाकार कु. सार्थक देशपांडे व प्रमुख पाहुण्या श्रीमती अंजली वळसंगकर यांच्या परिचय सौ. मेघना कुलकर्णी यांनी करून दिला. सार्थकच्या बासरी वादनाने मन व वातावरण प्रसन्न झाले. त्याने 'मोगरा फुलला' या गाण्याने सुरुवात करून काही हिंदी गीते वाजवली, सांगता 'जयोस्तुते श्री महनमंगले' या गीताने केली.

श्रीमती अंजली वळसंगकर यांची मुलाखत सौ. प्रतिमा जोशी यांनी खुमासदार शैलीत घेतली. त्यांचे अनुभव व काही मजेदार किस्से प्रेक्षकांना ऐकायला मिळाले.

तिळगुळाच्या लाडू तोंडांत ठेवून वाक्य बोलण्याचा मजेदार खेळ खेळण्यात आला. सर्वजणी उत्साहाने खेळात सहभागी झाल्या अन्य संलग्न संस्थेच्या महिला प्रतिनिधी कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होत्या. सौ. उज्ज्वला जोशी यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनानी झाली.

संस्थेचे माजी अध्यक्ष व माजी विश्वस्त श्री. वि. अ. देवरे यांनी आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ दिलेल्या कायमस्वरूपी देणगीतून हा कार्यक्रम आयोजित केला होता.

सर्वच महिला सभासदांनी कार्यक्रमाचे नियोजन व स्नेहभोजन याचे मनापासून कौतुक नोंदवले (व्हॉट्सॲपवरून) ही आनंदाची उपलब्धी आहे.

**कल्याण** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ कल्याण शाखेतर्फे आज दि. १५ जानेवारी २०२३ रविवार रोजी सायंकाळी ५.३० ते ९.०० या वेळेत सहकार मंदिर, कल्याण, येथे सुंदर अशा ओळख, हळदीकुंकू, तिळगुळ वाटप, असा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता. गेल्या तीन वर्षांच्या आपत्तीजनक परिस्थिती नंतर हा मोठा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाची सुरुवात नुतन सदस्या सौ. मंजिरी पसारे यांच्या सुमधुर गणेश वंदनेनं झाली. यानंतर महिला कार्यकारणी अध्यक्ष सौ. वृषाली वरुडकर यांनी उपस्थित महिला व पुरुष वर्ग सदस्यांचे स्वागत केले, प्रथम महिलांसाठी मकरसंक्रांत निमित्य हळदी कुंकू व तिळगुळ हा कार्यक्रम, नंतर महिला सदस्यांचा परिचय करुन त्यांना हळदी कुंकू व वाण महिला सदस्यांनकडुन देण्यात आले. या कार्यक्रमामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम जसे कथ्थक नृत्य, कथाकथन, भक्तीगीत, भावसंगीत, हिंदी गाणी अशी मैफल गुंफण्यात आली. यात सौ. गीताई काळकर, कुमारी मधुरा कुलकर्णी, सौ. भारती कुलकर्णी, श्री. रविंद्र कुलकर्णी, श्री. मनोज जवळेकर, यांनी गाणी सादर केली. कुमारी गौरी नाईक, कुमारी मधुरा जोशी यांनी नृत्य सादर केली, श्री. श्रीकृष्ण काळकर यांनी लघु कथा सादर केली. जेष्ठ सदस्यांच्या हस्ते अत्तर लाऊन तिळगूळ देण्यात येऊन तिळगूळ घ्या गोड गोड बोला हा पारंपरिक संदेश देण्यात आला.

हा सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न होण्यासाठी उपाध्यक्षा वैजयंती पतकी, वृषाली वरुडकर, मुग्धा घाटे, मेघा पुणतांबेकर, यांना संस्था सदस्य जयंत देशमुख, जितेंद्र कांबळे, कार्यवाह रमेश पालकर, मंगेश घाटे, व इतर सदस्यांनी सहकार्य केले. सर्व उपस्थितांचे आभार उपाध्यक्षा वैजयंती पतकी यांनी मानले. शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**मध्यवर्ती मंडळ** : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ आणि शिवाजी पार्क स्टडी सर्कल फॉर चार्टर्ड अकाउंटंट यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय अर्थसंकल्प २०२३-२४ सामान्यांसाठी या विषयावर सुप्रसिद्ध

अर्थतज्ञ श्री. उदय ताळदारकर यांचे विचार हा कार्यक्रम संस्थेच्या मध्यवर्ती सभागृहात आयोजित करण्यात आला होता. दादर माटुंगा तसेच मुंबई परिसरातील सभासद तसेच इतर स्थानिक या कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित होते. अर्थतज्ञ श्री. उदय तारदाळकर यांनी भारताची आर्थिक वैश्विक प्रगती व अर्थसंकल्पातील तरतुदी या विषयावर विस्तृत माहिती सभागृहात उपस्थिताना दिली. या कार्यक्रमास श्री. शरदचंद्रजी झरेगावकर हे अध्यक्ष म्हणून तसेच श्री. शशिकांत देसाई व संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. आनंद कुलकर्णी यांनी केले प्रमुख पाहुण्यांची ओळख संस्थेचे खजिनदार श्री. विनोद मांडके यांनी करून दिली आणि आभार प्रदर्शन श्री. मिलिंद सरदेशमुख यांनी केले.

**मध्यवर्ती मंडळ** : दि. २५ जानेवारी रोजी संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा. विलास जोशी, कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी, सचिव श्री. प्रसाद ठकार, कोषाध्यक्ष श्री. विनोद मांडके, श्री. मिलिंद सरदेशमुख, श्री. विजय चाव्हरे, श्री. विकास माने तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. या माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने संस्थेच्यावतीने मध्यवर्ती कार्यालयात यडॉ. व्हिजनल या प्रतिथयश संस्थेमार्फत मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. दादर, माटुंगा परिसरातील बहुसंख्य सभासद व नागरिकांनी याचा लाभ घेतला.

**वडोदरा (गुजरात)** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ वडोदरा संस्थेतर्फे दिनांक २२/०१/२०२३ रोजी सी. के. पाटीदार छात्रालय येथे तिळगुळ व हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमात एकूण १५० ते १७५ महिला व पुरुष सहभागी होते. या कार्यक्रमात बडोद्याचे आमदार श्री. बाळकृष्ण शुक्ल जे विधानसभाचे दंडक पण आहे यांना प्रमुख्य पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते. संस्थेकडून त्यांचा सत्कार याप्रसंगी करण्यात आला. वरिष्ठानकडून तिळगुळ व महिलांचे हळदी कुंकू कार्यक्रम संम्पन्न झाला.त्यानंतर महिलांचे खेळामध्ये सर्व महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला व कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने झाली या कार्यक्रमात सर्वांनी उत्साहाने व आनंदाने भाग घेतला.

**पुणे : ऋग्वेद भूषण व इतर विविध पुरस्कार वितरण समारंभ –** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक पुणे संस्थेच्यावतीने प्रतिवर्षी संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त ऋग्वेद भूषण व इतर विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात येते. त्यातील ऋग्वेद भूषण हा मानाचा पुरस्कार असून रोख रु. १०००१/-, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरुप आहे. या वर्षीचा हा मानाचा पुरस्कार ज्येष्ठ सिने दिग्दर्शक, श्री. राजदत्त यांना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीषजी प्रभुणे यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आला. तसेच सवाई गंधर्वाच्या कन्या स्व. प्रमिलाताई देशपांडे यांच्या स्मरणार्थ प्रतिवर्षी दिला जाणारा स्व. प्रमिलाताई देशपांडे संगीत पुरस्कार मागील दोन वर्षाचे कु. मयूरी अत्रे यांना सन २०२० चा, सौ. शिवानी दसक्कर यांना सन २०२१ चा व यावर्षीचा डॉ. अतिंद्र सरवडीकर यांना प्रदान करण्यात आला. रोख रु. ५०००/-, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरुप आहे. संस्थेचे संस्थापक कै. सरदार आबासाहेब मुजुमदार यांचे स्मरणार्थ समाजभूषण पुरस्कार मागील दोन वर्षाचे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, गिरगाव, मुंबई यांना सन २०२० चा, अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पुणे केंद्र यांना सन २०२१ चा व यावर्षीचा श्री शुक्ल यजुःशाखीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण सभा याज्ञवल्क आश्रम यांना प्रदान करण्यात आला. रोख रु. ३०००/-, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरुप आहे. सदरचा समारंभ रविवार, दि. २५ डिसेंबर २०२२ रोजी सायंकाळी ६.०० वा. गणेश सभागृह, न्यू इंग्लिश स्कूल प्रशाला, टिळक रोड, पुणे ३० येथे संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे स्वागतर प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेश धायगुडे यांनी केले. ज्येष्ठ सिने दिग्दर्शक

श्री. राजदत्त यांचा परिचय संस्थेचे कार्यकारी सदस्य श्री. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी करून दिला. मानपत्राचे वाचन अध्यक्ष डॉ. सु. व्यं. धायगुडे यांनी केले. प्रमुख पाहुणे श्री. गिरीषजी प्रभुणे यांचा परिचय श्री. सुधाकर तथा बापूराव कुलकर्णी यांनी करून दिला. सूत्रसंचालन श्री. सुनिल पारखी यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. अनिल पानसे यांनी केले.

याचवेळी इतर विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. त्याची यादी सोबत जोडली आहे. या कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त श्रीमती सुनिता तावरे, सौ. सुलभा शिरगावकर, श्री. बापूराव कुलकर्णी, डॉ. प्रशांत सुरु, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र कुलकर्णी सर्व पदाधिकारी, पुरुष व महिला कार्यकर्ते उपस्थित होते.

## जीवन गौरव पुरस्कार

### श्री. प्रभाकर दामोदर दशपुत्रे

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था, नाशिक तर्फे श्री. प्रभाकर दामोदर दशपुत्रे यांना जीवन गौरव पुरस्कारांने सन्मानित करण्यात आले. नाशिक येथे दि. ०५ फेब्रुवारी २०२३ रोजी झालेल्या स्नेहसंम्मेलनात नाशिकच्या आमदार श्रीमती देवयानी फरांदे, संस्थेचे अध्यक्ष श्री. मुकुंदराव कुलकर्णी यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सामंजस्याच्या भावनेतून अनेक वर्ष सामाजिक काम करणारे श्री. दशपुत्रे हे देशस्थ ऋग्वेदी मध्यवर्ती संघटनेच्या समाचारचे संपादकीय काम देखील अनेक वर्षे केले आहे. बेळगाव, सोलापूर, मुंबई येथील देशस्थ ऋग्वेदी संस्थेतर्फे आदर्श कार्यवाह म्हणून त्यांना पुरस्कारही मिळाला आहे. देशस्थ ऋग्वेदी संस्थेची युवक शाखा सुरु करण्यामागे याचा सिंहाचा वाटा होता. विद्यार्थी प्रिय, व्यासंगी शिक्षक, कुशल प्रशासक म्हणून ते नावारुपाला आले आहेत. आचार्य अत्रे वक्तृत्व स्पर्धादेखील यांनीच सुरु केली आहे. कमी तेथे आम्ही हे बिज मनात रोवून सामाजिक कार्याला झोकून देणारा कार्यकर्ता, कलाकार दे.ऋ. आयोजित नाटकातून भूमिका गाजवून तिकिट विक्रीतून येणारा पैसा दुर्गादेवी मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी अर्पित केला आहे. या बहुआयामी व्यक्तिस मानाचा मुजरा.

### श्री. अरविंद त्र्यंबकराव हस्तेकर

देशस्थ ऋग्वेदी संघ डोंबिवली संस्थेचे सन्माननीय विश्वस्त श्री. अरविंद त्र्यंबकराव हस्तेकर यांना या वर्षीचा मानाचा जीवन गौरव पुरस्कार दि. २९.०१.२०२३ रोजी संपन्न झालेल्या स्नेहसंम्मेलनात मा. श्री. शरदचंद्रजी झरेगावकर आणि डॉ. मंजुषा कुलकर्णी संस्थेचे अध्यक्ष श्री. जे. के. जोशी यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. श्री. अरविंद हस्तेकर हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, डोंबिवलीचे २००३-२००५ या काळात अध्यक्ष होते. २००५ पासून आजतागायत संस्थेचे विश्वस्त म्हणून काम पाहत आहेत. मध्यवर्ती संस्थेच्या परिषदेवर ते आजही कार्यरत असून पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून संपर्काद्वारे संस्था कार्यरत करण्याचे त्यांचे कार्य अव्याहतपणे आजही सुरु आहे. कोथरूड (पुणे) संस्था कार्यरत करण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. जिल्ह्या जिल्ह्यांचे दौरे करून मध्यवर्ती संघटना बळकटी करण्यासाठी त्यांचे प्रयत्न आजही सुरु आहेत. मध्यवर्ती संघटनेच्या सभासद वाढीसाठी त्यांचे योगदान मोलाचे आहे. शैक्षणिक व सामाजिक कार्यात ज्ञाती बांधवाला मदत करण्याचे तसेच मध्यवर्ती संस्थेच्या कार्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वास मानाचा मुजरा.

# दावोस जागतिक आर्थिक परिषद : स्वरुप व महत्त्व

**प्रभाकर कुलकर्णी** (मो. ९८२०६१९५८६)

गेली ५० वर्षे दावोस येथे जागतिक औद्योगिक परिषद भरत आहे. या परिषदेद्वारे जगातील सर्व उद्योजक, सामाजिक संस्था, वेगेवेगळ्या देशातील, राज्यातील राजकीय पुढारी एकत्र येऊन जगामध्ये औद्योगिक उत्कांती घडविण्यासाठी आणि सर्व स्तराच्या जगातील लोकांसाठी आयुष्यमान उंचावण्यासाठी काम करत असतात. या परिषदेमध्ये लाखो कोटींचे औद्योगिक करार करतात. त्यान्वये जगातील सर्व राष्ट्रांची औद्योगिक क्रांती घडून आली आहे. या परिषदेला एक हजारच्यावर देशातील उद्योजक वगैरे त्यांना दिलेल्या निमंत्रणानुसार जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यामध्ये स्विर्झलंडमधील दावोस या शहरामध्ये भेटत असतात.

सांगण्यास आनंद वाटतो की, २०२३ या वर्षी भारताचा अमृत महोत्सवी स्वातंत्र्य वर्ष आहे आणि ज्या वर्षी भारताला जगातल्या प्रागतिक उद्योग समुहांचे (G20) अध्यक्षपद मिळाले आहे. या वर्षी आपल्या महाराष्ट्राला याचे निमंत्रण मिळाले होते. आपले महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे यांनी या परिषदेला उपस्थित राहून जवळ-जवळ १.३६ लाख कोटींचे वेगवेगळे औद्योगिक सामंजस्य करार या परिषदेमध्ये केलेले आहेत. या करारा अंतर्गत महाराष्ट्रातील वाहन क्षेत्र, अक्षय ऊर्जा क्षेत्र, वैद्यकीय क्षेत्र, बायोबीक पायाभूत सुविधा केंद्र, शैक्षणिक क्षेत्र व इतर क्षेत्र, सगळ्या जागतिक दर्जाच्या मिळणाऱ्या सेवा उपलब्ध करून लोकांना देण्यात येतील. यामुळे महाराष्ट्रात जवळ-जवळ सत्तर हजारच्या वर नवीन रोजगार निर्माण होणार आहेत. या सामंजस्य कराराद्वारे महाराष्ट्रामध्ये खालील प्रकारची गुंतवणूक पुढील काही वर्षामध्ये अपेक्षित आहे.

१) न्यू एरा क्लीनटेक सोल्यूशन्स, चंद्रपूर येथे कोळशाच्या गैसीफीकेशनचा प्रकल्प येत आहे. त्याची किंमत २०००० कोटी आहे. २) कोनसरी गडचिरोली येथे वरद अ‍ॅलॉईड ही कंपनी स्टील प्लाँट उभारणार आहे. ३) ग्रीनको एनर्जी प्रोजेक्ट्स प्रा. लि. ही कंपनी १२००० कोटीचा प्रकल्प उभारणार आहे. ४) बर्कशायर हॅथवे होम सर्व्हिसेस ओरेंडा इंडिया ही कंपनी १६००० कोटींची गुंतवणूक करणार आहे. ५) ICP इन्व्हेस्टमेंट / इंडस कॅपिटल ही कंपनी १६००० कोटींची गुंतवणूक करणार आहे. ६) सुखी फूड ही कंपनी ४८० कोटींचा गुंतवणूक करणार आहे. ७) विप्रो फार्मा पॅकेजिंग इंडिया प्रा. लि. ही भारतातील कंपनी १६००० कोटींची गुंतवणूक करणार आहे. ८) गोगोरा इंजिनियरींग ही परदेशातील कंपनी २०००० कोटींची गुंतवणूक करणार आहे. ९) चाकण येथील महिंद्रा अँड महिंद्रा कंपनी इलेक्ट्रीकल वाहने उत्पादन केंद्रासाठी १०००० कोटींची गुंतवणूक करणार आहे. १०) युके मधील रेसबुक टाटा डेटा सेंटर ही १२००० कोटींची गुंतवणूक करणार आहे. ११) प्लॅस्टीक ऑटोमेटीव्ह मोल्ड विकसित करण्यासाठी पोर्तुगाल येथील कंपनी ४८० कोटींची गुंतवणूक करणार आहे.

अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील अशा या कंपन्या भारतामध्ये गुंतवणूक करणार आहेत. त्याचा फायदा निश्चितच महाराष्ट्रातील उद्योजकांना, तरुणांना मिळणार आहे.

या करांराद्वारे मुख्य म्हणजे दोन महाराष्ट्राचे फायदे दिसतात. एक म्हणजे या कराराद्वारे महाराष्ट्रातील अविकसित क्षेत्रामध्ये उदा. विदर्भ, मराठवाडा. विदर्भ येथे कोळसा गॅसीफीकेशन व गडचिरोली येथे वरद अ‍ॅलॉईड यांची जवळ-जवळ ३०००० हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. म्हणजेच १२ ते १५ हजार नवीन

रोजगार गडचिरोली, चंद्रपूर मध्ये निर्माण होतील. त्याद्वारे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी प्राप्त होतील. याद्वारे या विभागातील युवक काही कारणास्तव नक्षलवादी उपक्रम वगैरे यांच्या कार्याकडे वळले होते. ते निश्चितच एक विधायक कार्याकरता वळून तेथील बेरोजगारी कमी होऊन तेथील नक्षलवादी कार्यवाहीला देखील चाप बसेल ही फार मोठी अपेक्षा आहे. त्याशिवाय दुसरा महत्त्वाचा फायदा म्हणजे मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर या ठिकाणी अनेक प्रगत शिक्षण संस्था आहेत. उदा. IIT, Managing Institute या शिक्षण संस्थामधून आपली मुले, मुली हे आज उच्च शिक्षण घेतात. ते हुशार आहेत, प्रगल्भ आहेत आणि त्यांना काही कारणास्तव उच्च शिक्षण झाल्यानंतर रोजगाराच्या संधीसाठी परदेशात जावे लागते. या सगळ्या तरुणांना महाराष्ट्रामध्येच रोजगार निर्माण होतील त्यामुळे निश्चितच ते आकर्षित होतील. त्याद्वारे त्यांना पाहिजे तशी नोकरी त्यांच्या ज्ञानानुसार, बुद्धीमत्तेनुसार, अपेक्षेनुसार येथे प्राप्त होतील. त्यामुळे महाराष्ट्रात ज्याला आपण म्हणतो ब्रेन ड्रेन जो आता होतो आहे. तो ब्रेन ड्रेन थांबविण्यासाठी हे फार मोठे पाऊल ठरेल. एकूणच महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाठी मोठी भर पडून भारतातील नव्हे तर जागतिक औद्योगिक क्षेत्रात श्रीमंत औद्योगिक केंद्र म्हणून महाराष्ट्र ओळखले जाईल.


## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**अद्यावत नूतनीकरण केलेली**
**सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर – माहीम विभागातील**

### खालील मंगल कार्यालये

**– तळमजल्यावरील कै. राघाबाई कब्बूर वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह**

**– दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह.**

**✻ वैशिष्ट्ये ✻**

**वधू–वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन**
**मंगलकार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा.**
**सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य–तालीम,**
**संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध**

✻✻✻✻

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई – ४०० ०१६.**
**दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadrbm@gmail.com**

# जोडीदार निवडा

**वधू पाहिजे**..................................................................................................................

● नाव – **ओमकार मधुसूदन जोशी**, ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख – १५.०९.१९९५, जन्म वेळ – दुपारी १२.१०, जन्म स्थळ – नालासोपारा, गोत्र – भारद्वाज, रास – वृषभ, नक्षत्र – रोहिणी, प्रथम – चरण, गण – मनुष्य, नाडी – अंत्य, रक्तगट – O+ve, मंगळ – आहे, उंची – ५.६, शिक्षण – BMM (Mass Media) + Travel Tourism, नोकरी – Visa Executive at Thomas Cook (India) Ltd; Mumbai, वार्षिक पगार – ४ लाख, अपेक्षा – प्रथम वधू–शक्यतो स्वजातीय, उंची ५.४ पर्यंत, वयात ३–४ वर्षे अंतर अपेक्षित, पदवीधर–नोकरी करणारी, एकत्र कुटुंबात राहण्याची सवय, पत्रिका पहायची आहे. संपर्क – मधुसूदन जोशी ९८२१०८६५९१, ९९६०८५९७५२, ९१५८४५७२३१, पत्ता – प्लॉट नं. २६, विद्या–मेधा, विवाकुटीर, रोठा फाटक, केळवे रोड (पूर्व), तालुका–जिल्हा–पालघर–४०१४०१.

● नाव – **शुभंकर अरविंद सकळकळे**, ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख – २०.०८.१९९४, रक्तगट – O+ve, गोत्र – भारद्वाज, रास – मकर, नक्षस्त्र – श्रवण, अन्त्य नाडी, देव गण, चतुर्थ चरण, उंची – ६, बांधा – मध्यम, वर्ण – निमगोरा, जन्म स्थळ – जळगाव (खान्देश), शिक्षण – B.E. (Electronics & Tele Communication), नोकरी – IT Company, New Jersey America, अपेक्षा – अनुरुप, समव्यवसायाची व इतर व्यवसायातील चालेल, उच्चशिक्षित, नोकरी करणारी वा इच्छुक, संपर्क – अरविंद रामचंद्र सकळकळे ९९६९७२६१९५, सौ. सुलभा अरविंद सकळकळे ९८६९९८२४०५, पत्ता – इमारत क्र. १८, ए विंग, फ्लॅट नं.१०२, अजिंक्य को.ऑ.हौ.सोसायटी, बिंबीसार नगर, गोरेगांव (पूर्व), मुंबई

● नाव – **आनंद विजय चाव्हरे**, ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख – २०.०९.१९८९, शिक्षण – १२ वी कला, नोकरी – सहकारी बँक, कल्याण, गोत्र – वसिष्ठ, उंची – ५.५, चष्मा – नाही, वर्ण – गहू वर्ण, जन्म स्थळ – वरळी, मुंबई, बांधा – सडपातळ, रास – वृषभ, नक्षत्र – कृतिका, गण – राक्षस, नाडी – अंत्य, चरण – चतुर्थ, मंगळ – नाही, वडिलांचे नाव – विजय शांताराम चाव्हरे, आईचे नाव – जयश्री विजय चाव्हरे ८१०८७३५११८, पत्ता –ब–४०५, दैवराय सहकारी गृह संस्था, बाजार पेठ, पोलिस स्टेशन समोर, दुधनाका, कल्याण (पश्चिम) ४२१३०१. अपेक्षा – समकक्ष, गृहकृत्य दक्ष, कुठल्याही शाखेची चालेल, वयात अंतर चार ते पाच वर्षे.

● नाव – **ईशान सुनिल कुलकर्णी**, ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख – २९.११.१९९३, जन्म वेळ – सकाळी ०९.०१, जन्म स्थळ – डोंबिवली, गोत्र – शांडिल्य, रास – वृषभ, नक्षत्र – रोहिणी, प्रथम – चरण, गण – मनुष्य, नाडी – अंत्य, वर्ण – गहू वर्ण बांधा – मध्यम, चष्मा आहे, शिक्षण – BE (MECH); MBA (Mktg.), नोकरी व ठिकाण/हुद्दा (पोस्ट) – Lecturar in M/s. Jamboree Edu. Pvt. Ltd. Thane सर्वसमावेशक वार्षिक उत्पन्न – ८ लाख, अपेक्षा – सुयोग्य, अनुरुप, समकक्ष, संपर्क – सुनिल गोविंद कुलकर्णी ९८६९३००३२३, सौ. नेहा सुनिल कुलकर्णी ९३७२४९३०९०, पत्ता – ब/१०२, साई वैभव सहकारी गृह. संस्था, इंदिरा हॉस्पिटल जवळ, गावदेवी चौक, कल्याण (पश्चिम) ४२१३०१.

● नाव – **प्रथमेश नागेश कुलकर्णी**, जन्मतारीख – १५.०१.१९९५, जन्मवेळ – दुपारी २.२०, जन्मठिकाण – डोंबिवली, रास – मिथुन, गण – मनुष्य, गोत्र – कश्यप, शाखा – देशस्थ ऋग्वेदी, नक्षत्र – आद्रा, चरण – चतुर्थ, नाड – आद्य, उंची – ५.३, शिक्षण – एम.बी.ए. फायनान्स्, नोकरी – विप्रो टेक्नॉलॉजिस, हिंजेवाडी, पुणे, मासिक प्राप्ती – रु. २२,६००/–, अपेक्षा – किमान पदवीधर, अपेक्षा – अनुरूप, सुस्वभावी, कुटुंबवत्सल, पदवीधर किंवा उच्च पदवीधर, संपर्क – नम्रता कुलकर्णी (आई) ७८७५४९०९९९, ९६६५६११११९,

● नाव : **निनाद गिरीश कुलकर्णी**, ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख – ०१.०१.१९९२, गोत्र – मुनीभार्गव, वर्ण – गोरा, रक्तगट – B+ve मंगळ – नाही, उंची – ५.४, बांधा – मध्यम, शिक्षण – B.E. (Elc), नोकरी – TCS, रास – वृश्चिक, गण – देव, नाडी – मध्य, चरण – प्रथम, अपेक्षा – अनुरुप, नोकरी, पदवीधर, संपर्क – ९३२६३१५७८२ / ९८६९५६३६०३, पत्ता – १८०५/१८ वा मजला, श्री जयंत गणेश कृपा, सदाशिव क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई ४००००४.

● नाव : **अनिकेत अतुल जोशी**, ब्राह्मण पोटशाखा – शुक्ल यजुर्वेदी, जन्मतारीख – २३.०१.१९९५, गोत्र – वत्स, वर्ण – गोरा, रक्तगट – A+, मंगळ – नाही, उंची – १६५ सेमी, बांधा – मध्यम, शिक्षण – १२ वी पास, नोकरी व ठिकाण/हुद्दा (पोस्ट) – समर्थ सहकारी बँकेत शिपाई पदावर कामाला, मासिक उत्पन्न रु. २०,०००/–, अपेक्षा – मुंबईत जॉब करून रहायला होकार असला पाहिजे, संपर्क – ९००४९६४७२१, ९८६७३२७०४१, पत्ता – के/३०४, सोनम गोदावरी, पी/६, ओल्ड गोल्डन नेस्ट, मीरा रोड (पू.)

● नाव – **प्रथमेश किशोर शेंदुणीकर**, ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख – २४.०९.१९९२, गोत्र – अगस्ती, वर्ण – गोरा, नाडी– अंत्य, उंची – ५.९, बांधा – सडपातळ, शिक्षण – बीकॉम, एम.बी.ए. मार्केटींग, मासिक उत्पन्न रु. २०,०००/–, अपेक्षा – किमान पदवीधर, नोकरी करणारी किंवा तयार असणारी, संपर्क – ९४२३९७०४९७, पत्ता – तळमजला, अथर्व सहकारी गृह संस्था, भगवंत नगर, मुंबई नाका, नाशिक ४२२००९.

● नाव – **योगेश विनयकुमार देशपांडे**, ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख – २०.०८.१९९१, गोत्र – गौतम, वर्ण – गोरा, रक्तगट – B+ve, नाडी – आद्य, उंची – ५.५, बांधा – सडपातळ, शिक्षण – डिप्लोमा–इन–ऑटोमोबाईल इंजिनिअरींग, वार्षिक उत्पन्न रु. ४ लाख, अपेक्षा – प्रथम वधु, उंची ५ ते ५.४ वय २७ ते ३० मध्ये, अनुरुप, शिक्षणाची अट नाही, नोकरी करणारी किंवा करण्याची तयारी असावी, संपर्क – विलास देशपांडे ९४२३५८२५१६, पत्ता – चाफेकर चौक, चिंचवड, पुणे.

(**टीप** : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वतःची राहील.)

MRH

painttech
CONSULTANTS



Generations Changes BUT HULYALKAR
Technology SAME

**Mukund R. Hulyalkar**

Visits:
**By Appointment Only**
Available on Phone
9.00 a.m. to 6.00 p.m. (For local)
10.30 p.m. to 11.30 p.m. (For outstation)

**Acrylic Distemper**
**2**
**Zinc Silicate**

**Complete Paint World**
**"Choice of Bright People"**

NATIONALIST CONGRESS PARTY
**Mukund R. Hulyalkar — Paint Technologist**
Vice-President: South Central Mumbai Dist

| | | |
|---|---|---|
| **Hon. Editor** | : | Paint India |
| ***Secretary*** | : | Karnataka Progressive Education Society, Mahim, Mumbai |
| **President** | : | Deshastha Rugvedi Brahman Sangha, Dadar |
| ***I P President*** | | Colour Society U.D.C.T. Mumbai |
| ***Patron Member*** | : | Winner's Academy - Thane |
| ***Member*** | : | BIS Committee CHD 20, New Delhi |
| ***Award*** | : | ISSPA Mitra Award (2012) |
| | | Udyogshree By Maharashtra State Government |

Govindashram, (Near Hari Niwas), 224, L. J. Road, Dadar, Mumbai 400 028.
Mobile: 9821099494 • Tel.: 022-24456214 • Fax.: 022-24314865
E-mail: painttech_con@yahoo.com • Website: www.painttechconsultants.com



FE
INDIA'S
BEST
BANKS
AWARDS
IndusInd Bank
THE ULTIMATE
SAVINGS ACCOUNT IS HERE!
%
Attractive
Interest Rates
on Savings Account and
Fixed Deposits
VIDEO
Branch
Face-to-face banking
anytime, anywhere
My ACCOUNT
My NUMBER
Freedom to choose your
account number
Indus Mobile
All-in-one app for banking,
shopping, travel,
payments and much more
GET UP TO
20% OFF
on food & groceries
from Swiggy & BigBasket
TICKET
BUY ONE GET
ONE FREE
movie ticket
on BookMyShow
And much more...
Visit your nearest IndusInd Bank branch or
Call 1860 267 7777 | 022 4406 6666 | www.indusind.com
/OfficialIndusIndBankPage/
/indusind_bank/
/MyIndusIndBank
YouTube /user/IndusIndBank

*Best wishes from*

Reg. No. AR9/RSR/UOG/23952/96-97

# SAMARTH

## URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD., BELAGAVI.

**HEAD OFFICE :**
"Samarth Sadan", Gurukrupa complex,
1st Floor, 1513, Maruti Galli, BELAGAVI - 01.
Phone : 0831-2431367, 2403968
e-mail : samarthsociety@yahoo.com
Website : www.samarthsociety.co.in

**R C NAGAR BRANCH :**
"Bhagirathi" R.S. No. 731/D-2,
'C' Scheme, Channamma Nagar,
Main Road, BELAGAVI - 06.
Phone : 0831-2443181

**TILAKWADI BRANCH :**
"Classic Plaza" CTS 44/A2,
Somwarpeth, Tilakwadi,
BELAGAVI - 06.
Phone : 0831-2430357

**SHAHAPUR BRANCH :**
CTS 1103, 1st Floor,
Bichu Galli, Shahapur,
BELAGAVI - 03.
Phone : 0831-2431257

**KHANAPUR BRANCH :**
1524/A6, Mannerikar Building,
Beside State Bank,
Belagavi-Goa Road, KHANAPUR.
Mob. : 6363090655

## UNIQUE DEPOSIT SCHEME WITH ATTRACTIVE RATE OF INTEREST

### AKSHAY DEPOSIT

| | | | Regular | For Senior Citizen |
|---|---|---|---|---|
| 1) | 46 days to 180 days | ... | 6.00% p.a. | -- |
| 2) | 181 days to 364 days | ... | 6.50 p.a. | -- |
| 3) | 1 Year | ... | 8.00% p.a. | 9.00% p.a. |
| 4) | 2 Years | ... | 9.00% p.a. | 10.00% p.a. |
| 5) | 3 Years | ... | 10.00% p.a. | 11.00% p.a. |

**KALPATARU DEPOSIT : Double in 84 Months**

**GOLD LOAN 12.00% p.a.**

### LOAN SCHEMES

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Personal Security Loan | ... | 16.00% p.a. |
| 2) | Mortgage / Hypothecation / Business / Cash Credit / Govt. Security / Education Loan | | |
| | * Up to Rs. 10 Lakhs | ... | 14.25% p.a. |
| | * Above Rs. 10 Lakhs & upto Rs. 25 Lakhs | ... | 14.50% p.a. |
| | * Above Rs. 25 Lakhs upto Rs. 50 Lakhs & Above | ... | 15.00% p.a. |

### NIRANTAR (Recurring Deposit)

| | | |
|---|---|---|
| 1) | 1 Year | 8.00% p.a. |
| 2) | 2 Years | 9.00% p.a. |
| 3) | 3 Years | 10.00 p.a. |

### MADHU SANCHAY (Pigmy Deposit)

| | | |
|---|---|---|
| 1) | 6 Months | 3.00% p.a. |
| 2) | 1 Year | 4.00% p.a. |



**Ajay A. Sunalkar**
Chairman

### BOARD OF DIRECTORS

Ganapat A. Kulkarni
Abhay V. Joshi
Sou. Sunanda C. Altekar
Anil V. Bhandari
Umesh Sunagar
Vinayak G. Joshi
Pradeepkumar G. Kulkarni
Sou. Chaya N. Joshi
Parashuram M. Kamble
Ashok H. Pujeri



**Suhas R. Kulkarni**
Vice Chairman

Arvind S. Kulkarni (Secretary)

Raghavendra S. Kesnur (Gen. Manager)

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.
















Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH